Ijfans International Journal of Food and Nutritional Sciences
ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, Journal UGC CARE Listed (Group-I) Volume 14, Issue 05, Dec 2025

भारतीय शिक्षण मंडळाद्वारे प्रकाशित शिक्षणसमीक्षा या द्वैमासिकातील लेखांतील माहितीचे विश्लेषण (कालखंड २०१० ते २०२५)

बंड सुरेश गजानन[†] व डॉ. बोरकर विकास शंकरराव
संशोधन विद्यार्थी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर
ग्रंथपाल, के. झेड. एस. विज्ञान महाविद्यालय, कळमेश्वर

गोषवारा:

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश भारतीय शिक्षण मंडळाद्वारे प्रकाशित होणाऱ्या 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकामध्ये २०१० ते २०२५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या लेखांचे विश्लेषण करणे हा आहे. शैक्षणिक नियतकालिके ही शैक्षणिक विचार, संशोधन, समीक्षा आणि ज्ञानप्रसाराची महत्त्वपूर्ण माध्यमे आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील बिब्लिओमेट्रिक्स (ठपइसपवउमजतपबे) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकातील २०१० ते २०२५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या लेखांमधून आवश्यक माहिती संकलित करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात द्वितीयक तथ्य संकलन पध्तीचा उपयोग करण्यात आला आहे. संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की शिक्षणसमीक्षा मध्ये प्रकाशित बहुतांश लेख धार्मिक शिक्षणासंबंधित आहेत व सामाजिक शास्त्रे, तत्त्वज्ञान व मानसशास्त्र आणि साहित्य या विषयांना तुलनेने अधिक प्राधान्य मिळाले आहे. त्याचप्रमाणे 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात संशोधन लेखांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सर्वेक्षण अहवाल, पुस्तकाचे अवलोकन आणि केस स्टडी या लेखप्रकारांचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

बीज शब्द: शिक्षणसमीक्षा, भारतीय शिक्षण मंडळ, बिब्लिओमेट्रिक्स पद्धती, द्वैमासिक, शैक्षणिक नियतकालिक

१.० प्रस्तावना

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. शिक्षणव्यवस्थेतील बदल, शैक्षणिक धोरणे, अध्यापन पद्धती, अभ्यासक्रम, शिक्षकांची भूमिका, विद्यार्थ्यांचा विकास आणि शिक्षणासमोरील आव्हाने यांविषयी विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी शैक्षणिक नियतकालिके महत्त्वाची भूमिका बजावतात. भारतीय शिक्षण मंडळाद्वारे प्रकाशित होणारे 'शिक्षणसमीक्षा' हे द्वैमासिक या संशोधनासाठी अभ्यासाचे प्रमुख साधन आहे. नियतकालिकातील लेखांचे विश्लेषण हे केवळ प्रकाशित लेखांची संख्या मोजण्यापुरते मर्यादित नसून त्यातील आशय, विषयप्राधान्य, लेखनपद्धती आणि संदर्भांचा वापर यांचा अभ्यास करण्याची प्रक्रिया आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये २०१० ते २०२५ या कालखंडात 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे विश्लेषण करण्यात आले आहे. हा कालखंड सोळा वर्षांचा असून या कालावधीतील लेखांचा अभ्यास केल्यामुळे दीर्घकालीन प्रवाह आणि विषयांमधील बदल यांचे

निरीक्षण करता येऊ शकते. तथापि, कोणते विषय अधिक प्रमाणात प्रकाशित झाले, कोणत्या वर्षी लेखांची संख्या सर्वाधिक होती किंवा संदर्भलेखनाच्या नियमांचे किती प्रमाणात पालन झाले, याविषयीचे निष्कर्ष प्रत्यक्ष संकलित माहितीच्या विश्लेषणावर आधारित आहे. अशा प्रकारे, 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकातील २०१० ते २०२५ या कालखंडातील लेखांचे विश्लेषण हे शैक्षणिक नियतकालिकांच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

२.० संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील बिब्लिओमेट्रिक्स (ठपइसपवउमजतपबे) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकातील २०१० ते २०२५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या लेखांमधून आवश्यक माहिती संकलित करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात द्वितीयक तथ्य संकलन पध्तीचा उपयोग करण्यात आला आहे. सर्व सांख्यिकीय चाचण्या ैै १८.० या सॉफ्टवेअरद्वारे करण्यात आल्या.

३.० तथ्याचे सांख्यिकीय विश्लेषण

३.१ प्रकाशित माहितीचा प्रकार

सारणी क्र. १: प्रकाशित लेखांमधील माहितीचा प्रकार दर्शविणारी सारणी

माहितीचा प्रकार	संख्या	टक्केवारी
उच्च शिक्षण संबंधित	९४	१५.०
सामाजिक विषय	१०९	१७.४
आर्थिक विषय	२३	३.७
धार्मिक विषय	२०६	३२.९
भाषा संबंधित	५७	९.१
अन्य	१३८	२२.०
एकूण	६२७	१००.०

वरील सारणी क्र. १ मध्ये भारतीय शिक्षण मंडळाच्या 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात प्रकाशित लेखांमधील माहितीचा प्रकार दर्शविण्यात आला आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १५.० टक्के ग्रंथपालांप्रमाणे प्रकाशित लेख उच्च शिक्षणासंबंधित असतात तर १७.४ टक्के ग्रंथपालांप्रमाणे हे सामाजिक विषयासंबंधी असतात. तसेच ३.७ टक्के, ३२.९ टक्के व ९.१ टक्के ग्रंथपालांप्रमाणे प्रकाशित लेख आर्थिक, धार्मिक व भाषासंबंधित असून २२.० टक्के ग्रंथपालांप्रमाणे लेख अन्य प्रकारच्या माहितीसंबंधित असल्याचे आढळले.

३.२ प्रकाशित लेखांचे विषयानुसार वर्गीकरण

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, Journal UGC CARE Listed (Group-I) Volume 14, Issue 05, Dec 2025

सारणी क्र. २: प्रकाशित लेखांचे विषयानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

लेखाचा विषय	संख्या	टक्केवारी
संगणक शास्त्र, माहिती आणि सामान्य विषय	५३	८.५
तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र	९८	१५.६
धर्म	७४	११.८
सामाजिक शास्त्रे	१०९	१७.४
भाषा	५७	९.१
विज्ञान (नैसर्गिक विज्ञान आणि गणित)	४१	६.५
तंत्रज्ञान (उपयोजित विज्ञान)	२३	३.७
कला आणि मनोरंजन	५२	८.३
साहित्य	८६	१३.७
इतिहास आणि भूगोल (चरित्रांसह)	३४	५.४
एकूण	६२७	१००.०

वरील सारणी क्र. २ मध्ये भारतीय शिक्षण मंडळाच्या 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात प्रकाशित झालेल्या ६२७ लेखांचे विषयानुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीवरून असे दिसून येते की सामाजिक शास्त्रे या विषयाशी संबंधित लेखांची संख्या सर्वाधिक १०९ (१७.४ टक्के) आहे. तसेच तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र ९८ (१५.६टक्के), साहित्य ८६ (१३.७टक्के), धर्म ७४ (११.८टक्के), भाषा ५७ (९.१टक्के), संगणकशास्त्र, माहिती आणि सामान्य विषय ५३ (८.५टक्के) आणि कला व मनोरंजन ५२ (८.३टक्के) या विषयाचे लेख प्रकाशित झाले आहेत. त्याचप्रमाणे विज्ञान (नैसर्गिक विज्ञान आणि गणित) या विषयाचे ४१ (६.५टक्के) लेख, इतिहास आणि भूगोल (चरित्रांसह) ३४ (५.४ टक्के) लेख आणि तंत्रज्ञान (उपयोजित विज्ञान) २३ (३.७ टक्के) लेख प्रकाशित झाले आहेत.

३.३ लेखांचा प्रकार

सारणी क्र. ३: लेखांचा प्रकार दर्शविणारी सारणी

लेखांचा प्रकार	संख्या	टक्केवारी
संशोधन लेख	५१४	८२.०
सर्वेक्षण अहवाल	४८	७.७
केस स्टडी	२६	४.१
पुस्तकाचे अवलोकन	३९	६.२
एकूण	६२७	१००.०

Ijfans International Journal of Food and Nutritional Sciences
ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, Journal UGC CARE Listed (Group-I) Volume 14, Issue 05, Dec 2025

वरील सारणी क्र. ३ मध्ये भारतीय शिक्षण मंडळाच्या शिक्षणसमीक्षा या द्वैमासिकात २०१० ते २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या लेखांचा प्रकार दर्शविण्यात आला आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार भारतीय शिक्षण मंडळाच्या 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात प्रकाशित एकूण ६२७ लेखांपैकी ५१४ (८२.०टक्के) लेख संशोधन लेख तर ४८ (७.७टक्के) लेख सर्वेक्षण अहवाल असल्याचे आढळले. तसेच ३९ (६.२टक्के) लेख पुस्तकाचे अवलोकन आणि २६ (४.१टक्के) लेख केस स्टडी या प्रकारातील असल्याचे आढळले.

४.० निष्कर्ष

४.१ प्रकाशित माहितीचा प्रकार

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की शिक्षणसमीक्षा मध्ये प्रकाशित बहुतांश लेख धार्मिक शिक्षणासंबंधित आहेत.

४.२ प्रकाशित लेखांचे विषयानुसार वर्गीकरण

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की सामाजिक शास्त्रे, तत्त्वज्ञान व मानसशास्त्र आणि साहित्य या विषयांना तुलनेने अधिक प्राधान्य मिळाले आहे.

४.३ लेखांचा प्रकार

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात संशोधन लेखांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सर्वेक्षण अहवाल, पुस्तकाचे अवलोकन आणि केस स्टडी या लेखप्रकारांचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

५.० संदर्भ

- ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पुणे : महाराष्ट्र राज्य पाठय पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.
- घाटोळे.रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००९—१०.पृ.क्र. १ ते २३.
- भारतीय शिक्षण मंडळ. (२०२५). शिक्षण समीक्षा, भारतीय शिक्षण मंडळ, नागपूर.
- ठंदेींसए ैण ज्ञणए ैपदहीए टण ज्ञणए ज्ञंकमतलमए ळणए डनीनतपए च्ण ज्ञ ंदक ैह्यदबीम्रए ठण च्ण ;२०१८द्धण ।द ंसजउमजतपब ंदंसलेपे वि ंबीवसंतसल ंतजपबसमे तिवउ प्दकपंए *श्रवनतदंस वि प्दजमससपहमदज — थ्नरल ैलेजमउेरू ।चचसपबंजपवदे पद म्दहपदममतपदह ंदक ज्मबीदवसवहलए* ३४;५द्धए चचण ३१११.३११८ण
- ळंतहए ज्ञण ब ंदक ैपदहीए तण ज्ञण ;२०२३द्धण । ठपइसपवउमजतपब ेजनकल वि च्ंचमते च्नइसपेीमक पद जीम प्दकपंद श्रवनतदंस वि छंजनतंस च्तवकनबजे ंदक त्मेवनतबमे कनतपदह २०१०.२०२०ए *प्दकपंद श्रवनतदंस वि छंजनतंस च्तवकनबजे ंदक त्मेवनतबमे*ए१४;२द्धए चचण ३१३.३२३ण

IJFANS International Journal of Food And Nutritional Sciences Official Publication of International Association of Food and Nutrition Scientists

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, Journal UGC CARE Listed (Group-I) Volume 14, Issue 05, Dec 2025

- भ्ंकपउंदप छण्ए डनससं ज्ञण त ंदक ज्ञनउंत छण्ैण ;२०१५द्धण । इपइसपवउमजतपब ंदंसलेपे वि तमेमंतबी चनइसपबंजपवदे वि प्दकपंद प्देजपजनजम वि ैबपमदबम म्कनबंजपवद ंदक त्मेमंतबीए जीपतनअंदंदजींचनतंउए *श्रवनतदंस वि ।कअंदबमउमदजे पद स्पइतंतल ैबपमदबमे*ए २;१द्धए चचण२८.३५ण
- भ्नेंपदए ै ंदक ज्ञींदंउए ृण ;२०१५द्धण ब्पजंजपवद ।दंसलेपे वि जीम श्रवनतदंस ष्।ददंसे वि स्पइतंतल ंदक प्दवितउंजपवद ैजनकपमेष ;२००५.२०१४द्धए *श्रवनतदंस वि ।कअंदबमे पद स्पइतंतल ंदक प्दवितउंजपवद ैबपमदबम*ए ४;३द्धए चचण२१७.२२१ण
- च्ंबींनतपए ै ंदक ैपदहीए क्ण टण ;२०२५द्धण ज्तमदके पद च्नइसपबंजपवदए ।नजीवतेीपच च्ंजजमतद ंदक ब्वससंइवतंजपवद छमजूवतो पद प्दकपंद श्रवनतदंस वि ।दपउंस ैबपमदबमेरू । ठपइसपवउमजतपब ैजनकल ;२०१०.२०२४द्धए *प्दकपंद श्रवनतदंस वि ।दपउंस च्तवकनबजपवद ंदक डंदंहमउमदज*ए ४१;२द्धए चचण १३.२२ण